## सहकारातून समृद्धीचा नवा महामार्ग

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या सहकार क्षेत्राला आणि साखर उद्योगाला आगामी काळात एक नवी दिशा आणि मोठी गती मिळण्याचे संकेत मिळाले आहेत. केंद्रीय सहकार मंत्र्यांनी राज्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या दोन मोठ्या प्रकल्पांची घोषणा केली असून, यामुळे प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील सहकार चळवळीला मोठे बळ मिळणार आहे.....


---> अग्रलेख - पान 2 वर


# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

## पॉलीटेक्निक प्रवेश अर्जासाठी दोन जुलैपर्यंत मुदतवाढ

**मुंबई,** : प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी (पॉलीटेक्निक) अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज सादर करण्याची मुदत वाढविण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज भरण्याची अंतिम तारीख 22 जून 2026 होती. मात्र विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद आणि विविध आवश्यक प्रमाणपत्रे मिळण्यास होत असलेला विलंब लक्षात घेऊन ही मुदत आता 2 जुलै 2026 पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगर ❁ मंगळवार, दि. २३ जून २०२६ ❁ वर्ष : १ ❁ अंक : ६४ ❁ पाने : ४ ❁ किंमत : ४ रू. ❁ Email : hinduprakashvarta@gmail.com


## थोडक्यात वार्ता

### लखनौत इमारतीला आग, 14 जणांचा मृत्यू, मदत जाहीर

**लखनौ :** उत्तर प्रदेशातील लखनौच्या अलिगंजमधील पुरानिया परिसरात आज, सोमवारी दुपारी एक तीन मजली इमारतीला भीषण आग लागली. या इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावर कोचिंग सेंटर होते. त्यामध्ये अनेक विद्यार्थी अडकले होते. मिळालेल्या माहितीनुसार या आगीत १४ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती आहे. यात बहुतांश विद्यार्थ्यांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार या आगीत 14 विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, मुख्यमंत्री फोनवरून बचाव कार्याची माहिती सातत्याने घेत आहेत. दुसऱ्या मजल्यावर सुरू असलेल्या कोचिंगमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःला बाथरूममध्ये बंद करून घेतले होते. एका मुलाने पहिल्या मजल्यावरून उडी मारून आपला जीव वाचवला. पण तो खाली ग्रीलवर पडला आणि गंभीर जखमी झाला. अग्निशमन दलाच्या सुमारे 10 गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी इमारतीची मागची भिंत तोडली आहे, ज्यातून मृतदेह बाहेर काढण्यात आले.

### पी. वेलरासू यांच्यासह तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई :** राज्य सरकारने सोमवारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि महापारेषणमधील तीन वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. पी. वेलरासू (२००२ बॅच) यांच्या १६ जून रोजीच्या बदली आदेशात अंशतः बदल करण्यात आला असून, आता त्यांची 'एमएमआरडीए'च्या अतिरिक्त महानगर आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (२००३ बॅच) यांची मंत्रालयातील अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सचिवपदी बदली करण्यात आली आहे. तर, 'एमएमआरडीए'चे अतिरिक्त महानगर आयुक्त विक्रम कुमार (२००४ बॅच) यांच्याकडे आता महापारेषणच्या (महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकपदाची नवीन जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

### वीज पडून 8 जणांचा मृत्यू, क्रिकेट सामन्यादरम्यान एकाचा अंत

**रांची (झारखंड) :** झारखंडमध्ये नैऋत्य मान्सूनच्या आगमनासोबतच निसर्गाचे रौद्र रूप पाहायला मिळत आहे. गेल्या २४ तासांत राज्यातील विविध जिल्ह्यांत वीज पडून तब्बल आठ जणांचा मृत्यू झाला असून, डझनभर नागरिक जखमी झाले आहेत. या घटनांमुळे संपूर्ण राज्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. खुंटी जिल्ह्यातील कर्रा पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या पात्रटोली गावात रविवारी एका क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. खेळ सुरू असतानाच अचानक वीज कोसळली. या दुर्दैवी घटनेत प्रेम बखला या तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य सहा खेळाडू जखमी झाले. जखमींपैकी अंकित बखला आणि जक्कीम मिंज यांची प्रकृती गंभीर असून, त्यांना पुढील उपचारांसाठी रांची येथील रिम्स रुग्णालयात हलवण्यात आले आहे. केवळ एका आठवड्याच्या अंतरात (१३ जूनपासून) झारखंडमध्ये पावसाने आणि वीज पडल्याने एकूण १६ हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. हवामान विभागाने राजधानी रांचीसह राज्याच्या सहा जिल्ह्यांमध्ये 'ऑरेंज' आणि 'यलो अलर्ट' जारी केला आहे. २५ जूनपर्यंत राज्यात ढगाळ वातावरण आणि पावसाचा जोर कायम राहणार असून तापमानात घट होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# अल्टिमेटमवर अल्टिमेटम, तरी नाले गाळातच; पावसाआधीच महापालिकेच्या तयारीची पोलखोल

## दोन महिन्यांपासून आदेश, पाहण्या आणि बैठका सुरू; नालेसफाईचे काम अद्याप अपूर्णच

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात पावसाळ्याची सुरुवात झाली असली तरी महापालिकेची नालेसफाई मात्र अजूनही अर्धवटच असल्याचे वास्तव समोर आले आहे. स्थायी समिती सभापतींनी वारंवार पाहणी करून अधिकाऱ्यांना अल्टिमेटम दिले, कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले; मात्र अनेक नाले आजही गाळ, कचरा आणि अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेले आहेत. त्यामुळे पावसापूर्वी सर्व तयारी पूर्ण झाल्याचा महापालिकेचा दावा आता संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.





छत्रपती संभाजीनगर महापालिकेकडून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाईवर लाखो-कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. बैठका, पाहणी दौरे, आढावा बैठका आणि आदेशांचा धडाका सुरू असतो. मात्र यंदाही प्रत्यक्षात नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचे चित्र शहरभर दिसत आहे. विशेष म्हणजे ७ मे रोजी मोती कारंजा ते संभाजी पेठ परिसरातील नाल्यांची तातडीने सफाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर अनेकदा संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मात्र १७ जून रोजी झालेल्या पाहणीत नालेसफाईचे अवघे ५० टक्के काम पूर्ण झाल्याचे स्पष्ट झाले. उर्वरित कामाचे काय झाले, हा प्रश्न आता नागरिक उपस्थित करत आहेत. शहरातील अनेक भागांत नाल्यातील गाळ उपसून तो नाल्याच्या कडेलाच टाकण्यात आला आहे. हा गाळ उचलण्याचे कामही पूर्ण झालेले नाही. परिणामी पहिल्याच जोरदार पावसात हा सर्व गाळ पुन्हा नाल्यात जाणार असून संपूर्ण नालेसफाई प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. प्रशासनाच्या या हलगर्जीपणामुळे लाखो रुपयांचा खर्च अक्षरशः पाण्यात जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मोती कारंजा, गांधीनगर, औषधी भवन, संभाजीपेठ, नाथ मार्केट, दुल्हा-दुल्हन चौक, समर्थनगर आदी भागांतील नागरिकांनी नालेसफाईच्या कामाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अनेक ठिकाणी नाल्यांची रुंदी कमी झाली असून अतिक्रमण कायम आहे. काही भागांत नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचलेला असून सफाईची कामे अपूर्ण अवस्थेत दिसत आहेत.

याहून गंभीर बाब म्हणजे नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण न झाल्याने मुसळधार पावसात शहरातील सखल भागांमध्ये पाणी साचण्याचा धोका वाढला आहे. घरांमध्ये पाणी घुसणे, रस्ते जलमय होणे, वाहतूक विस्कळीत होणे आणि व्यापारी भागांचे नुकसान होणे अशा समस्या निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

स्थायी समिती सभापतींचे वारंवार अल्टिमेटम, अधिकाऱ्यांच्या बैठका आणि पाहणी दौरे सुरू असतानाही प्रत्यक्षात कामे रखडलेली दिसत असल्याने आदेश

> **"आदेश झाले, पाहण्या झाल्या, अल्टिमेटम दिले गेले; पण नाले अजूनही गाळातच आहेत. पहिल्याच मोठ्या पावसात शहर तुंबले तर जबाबदार कोण?"**
> **- स्थानिक नागरिक**

केवळ कागदावरच राहिले का, अशी चर्चा शहरात सुरू झाली आहे. कामात दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारांवर अथवा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, याबाबतही महापालिका प्रशासनाने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

पावसाळ्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या शहरासाठी ही परिस्थिती धोक्याची घंटा मानली जात आहे. ७ मेपासून सुरू असलेली नालेसफाई २२ जूनपर्यंतही पूर्ण होत नसेल, तर पावसाळ्यापूर्वी सर्व तयारी पूर्ण झाल्याचा दावा महापालिका कोणत्या आधारावर करत आहे, हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांपासून लोकप्रतिनिधींपर्यंत सर्वांच्या चर्चेचा विषय बनला आहे.

## अडीच वर्षांत महाराष्ट्रातून 3 हजार 541 बांगलादेशी घुसखोरांची हकालपट्टी

**मुंबई :** वर्ष २०२४ पासून आजपर्यंत म्हणजेच गेल्या अडीच वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रातून तब्बल ३ हजार ५४१ बांगलादेशी घुसखोरांना हुडकून काढून त्यांची पुन्हा बांगलादेशात हकालपट्टी करण्यात आली आहे. याशिवाय, अद्यापही राज्यात मोठ्या संख्येने बांगलादेशी नागरिक बेकायदेशीरपणे वास्तव्यास असून, त्यातील काही जणांवर सध्या विविध न्यायालयांमध्ये कायदेशीर खटले प्रलंबित आहेत. बांगलादेशी घुसखोर केवळ राज्यात बेकायदेशीरपणे वास्तव्य करण्यासोबतच भारतीय नागरिकांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ घेत असल्याचे समोर आले आहे. राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) सखोल तपास करून अशा संशयित बांगलादेशी घुसखोरांच्या नावांची एक सविस्तर सूची राज्य सरकारकडे सुपूर्द केली आहे. या यादीच्या आधारे हे घुसखोर रेशनिंग, घरे किंवा इतर सबसिडी लाटत आहेत का, याचा शोध घेण्याचे आदेश देण्यात आले होते. अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने राज्यातील सर्व जिल्ह्यांतील जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना ही यादी पाठवून तपास करण्याचे निर्देश दिले होते.

## पैठणमध्ये 27 वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून निर्घृण हत्या; दोन संशयित ताब्यात

**पैठण प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुका पुन्हा एकदा रक्ताळला असून एका भीषण हत्याकांडामुळे संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. पैठण येथील जायकवाडी उत्तर भागात एका २७ वर्षीय तरुणाची लोखंडी गज आणि दगडाने डोके ठेचून अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ माजली असून नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अमोल उर्फ प्रभू भास्कर सुरडकर (वय २७, रा. संजयनगर, कातपूर) असे खून झालेल्या दुर्दैवी तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पैठणच्या जायकवाडी उत्तर परिसरातील रस्त्यालगत असलेल्या वेड्या बाभळीच्या दाट झाडीत सोमवारी एका तरुणाचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह काही नागरिकांना दिसून आला. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच परिसरातील लोकांनी घटनास्थळी एकच गर्दी केली होती. नागरिकांनी तातडीने या घटनेची माहिती स्थानिक पोलिसांना दिली. माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी आणि फॉरेन्सिक (न्यायवैद्यक) पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

घटनास्थळाचे दृश्य अत्यंत थरकाप उडवणारे होते. अमोलचा खून करण्यासाठी मारेकऱ्यांनी क्रूरतेची सीमा ओलांडली होती. पोलिसांनी घटनास्थळावरून रक्ताने माखलेले मोठे दगड आणि एक लोखंडी गज जप्त केला आहे. याच शस्त्रांनी अमोलचा घात करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळावरून रक्ताचे नमुने, ठसे आणि इतर महत्त्वाचे वैज्ञानिक पुरावे संकलित केले आहेत. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तो उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात रवाना केला.

या निर्घृण खुनाचे वृत्त समजताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. एमआयडीसी पोलिसांनी संशयाच्या आधारे तातडीने दोन जणांना ताब्यात घेतले असून, गुप्त ठिकाणी त्यांची कसून चौकशी सुरू आहे. अमोल सुरडकर याचा खून नेमक्या कोणत्या वादातून किंवा कारणातून करण्यात आला, याचा उलगडा अद्याप होऊ शकलेला नाही. जुनी वैमनस्य, आर्थिक व्यवहार की आणखी काही कौटुंबिक वाद यामागे आहे का, या दिशेने पोलीस सध्या सखोल तपास करत आहेत. लवकरच या गुन्ह्यातील मुख्य आरोपींना अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

## चिकलठाण्यातील हिनानगरात गोमांस विकताना दोघांना रंगेहात पकडले; 50 किलो गोमांस जप्त

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

शहरातील चिकलठाणा भागातील हिनानगरात अवैधपणे गोमांस विक्री करणाऱ्या दोन जणांना रविवारी (२१ जून) सकाळी १० च्या सुमारास रंगेहात पकडण्यात आले. महानगरपालिकेच्या अवैध कत्तलविरोधी पथकाने ही धडक कारवाई केली असून, संशयितांच्या ताब्यातून १५ हजार रुपये किमतीचे ५० किलो गोमांस जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे पशुधन पर्यवेक्षक अधिकारी तथा अवैध कत्तलविरोधी पथकाचे प्रमुख लक्ष्मण फुले हे आपल्या सहकाऱ्यांसह रविवारी सकाळी चिकलठाणा परिसरात गस्त घालत होते. गस्तीदरम्यान हिनानगरातील एका दुकानात दोन इसम संशयास्पद रित्या मांस विक्री करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. पथकाने तात्काळ दुकानाची झडती घेतली असता, तिथे मोठ्या प्रमाणावर गोमांस आढळून आले. या कारवाईत पोलिसांनी आणि मनपा पथकाने दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. पकडण्यात आलेल्या आरोपींची नावे खालीलप्रमाणे आहेत. सलमान युसूफ खान (वय ३२, रा. वरूड काजी, ता. छत्रपती संभाजीनगर) फैजान हारुण कुरेशी (वय २५, रा. चिकलठाणा) या प्रकरणी मनपा अधिकारी लक्ष्मण फुले यांनी दिलेल्या तक्रारीवरून सलमान खान आणि फैजान कुरेशी यांच्याविरुद्ध सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्यात बेकायदेशीर गोमांस विक्री आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार साहेब खान पठाण करत आहेत. चिकलठाणा सारख्या गजबजलेल्या भागात अशा प्रकारे अवैध मांस विक्री उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली असून, अशा अवैध अड्ड्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## टीईटी परीक्षेसाठी प्रशासन सज्ज; केंद्र संचालकांना सविस्तर मार्गदर्शन

### 50 परीक्षा केंद्रांच्या पूर्वतयारीचा आढावा; पारदर्शक व सुरळीत परीक्षा घेण्यावर भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आगामी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) सुरळीत, पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी देवगिरी महाविद्यालयातील रवींद्रनाथ टागोर सभागृहात पूर्वतयारी बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत परीक्षा केंद्रांवरील व्यवस्थापन, केंद्र संचालकांच्या जबाबदाऱ्या, सुरक्षा उपाययोजना तसेच परीक्षेच्या पारदर्शक अंमलबजावणीसंदर्भातील विविध बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीस ५० परीक्षा केंद्रांसाठी नियुक्त करण्यात आलेले केंद्र संचालक, सहाय्यक परिरक्षक तसेच झोनल अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीमती जयश्री चव्हाण यांनी परीक्षा प्रक्रियेतील शिस्त, जबाबदारी आणि दक्षतेचे महत्त्व अधोरेखित करत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

तसेच उपशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ, गीता तांदळे, शिक्षण विस्तार अधिकारी संगीता साळुंखे आणि शिवाजी भोसले यांनीही परीक्षा व्यवस्थापनासंदर्भात मार्गदर्शन केले.

या बैठकीस जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) चे प्राचार्य कांबळे, योजनाचे उपशिक्षणाधिकारी अरुण शिंदे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. टीईटी परीक्षा यशस्वी आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## साजापूरच्या आठवडे बाजारात मुदतबाह्य होणाऱ्या सिरपच्या बाटल्यांचा मोठा साठा जप्त

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** वाळूज MIDC क्षेत्रातील साजापूर येथील आठवडे बाजारात अचानक मोठ्या प्रमाणावर सिरपच्या बाटल्यांचा साठा आढळून आल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. मुदतबाह्य (Expire) होण्यास अवघे काही दिवस शिल्लक असलेल्या या औषधांचा साठा अज्ञात इसमांनी या ठिकाणी आणून टाकल्याचे उघडकीस आले असून, या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. साजापूर येथील आठवडे बाजाराच्या मोकळ्या जागेत हजारो सिरपच्या बाटल्यांचा साठा बेवारस स्थितीत पडलेला नागरिकांना दिसून आला. या बाटल्यांची पाहणी केली असता, त्या सर्व औषधी बाटल्यांची अंतिम मुदत (Expiry Date) संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असल्याचे समोर आले. नियमानुसार अशा औषधांची विल्हेवाट लावण्यासाठी एक ठरावीक आणि सुरक्षित प्रक्रिया असते. मात्र, ती डावलून अशा प्रकारे सार्वजनिक ठिकाणी औषधे उघड्यावर टाकून दिल्याने परिसरात भीतीचे आणि आश्चर्याचे वातावरण आहे. लहान मुले किंवा इतर कोणी या औषधांचे सेवन केले असते, तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता



येत नव्हती. या धक्कादायक प्रकारानंतर वाळूज MIDC पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. हे औषध कोणी मॅन्युफॅक्चर केले? त्याचा बॅच नंबर काय आहे? आणि हा साठा कोणत्या

> **"सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे घातक औषधे टाकणे हा नागरिकांच्या जिवाशी खेळ आहे. या बाटल्यांचे गूढ प्रशासनाने तात्काळ उचलावावे."**
> **सागर त्रिभुवन — स्थानिक नागरिक, साजापूर**

वितरकाचा होता? याचा शोध घेतल्यास मुख्य सूत्रधार सहज गळाला लागू शकतो. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कारवाईच्या धास्तीमुळे प्रकार?

सध्या अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या धडक नेतृत्वात संपूर्ण राज्यात आणि जिल्ह्यात बनावट, विनापरवाना तसेच नियमबाह्य औषध विक्री व साठवणुकीविरुद्ध कडक कारवाईचा धडाका सुरू आहे. अनेक मेडिकल स्टोअर्स आणि गोदामांवर छापे टाकले जात आहेत. त्यामुळेच कारवाईच्या आणि दंडाच्या भीतीने घाबरून औषध विक्रेत्यांनी किंवा वितरकांनी हा साठा छुप्या पद्धतीने रात्रीच्या वेळी इथे आणून टाकला असावा, अशी दाट शक्यता वर्तवली जात आहे.

## "खरं की काय"



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## देवस्थान जमिनींचे संवर्धन आणि सर्वसामान्यांचे हित

महाराष्ट्रातील देवस्थान इनाम जमिनींच्या व्यवस्थापनाचा आणि संवर्धनाचा प्रश्न अत्यंत जुना आणि गुंतागुंतीचा आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या समस्येला मार्गी लावण्यासाठी राज्य सरकारने आता एक ठोस पाऊल उचलले आहे. राज्यातील देवस्थान इनाम जमिनींचे संवर्धन करण्यासह वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या समस्या सोडवण्यासाठी एक सर्वंकष आणि सर्वसमावेशक कायदा तयार करण्यात यावा, अशा स्पष्ट सूचना महसूलमंत्र्यांनी दिल्या आहेत. मंत्रालयात पार पडलेल्या 'देवस्थान इनाम जमीन धोरण प्रारूप समिती'च्या पहिल्याच बैठकीत या कायद्याचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला, ही अत्यंत स्वागतार्ह आणि काळाची गरज असलेली गोष्ट आहे. देवस्थानच्या जमिनींशी संबंधित कायदा करताना घाईगडबड न करता अत्यंत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच इतर जुन्या कायद्यांचा सखोल अभ्यास करूनच नवा मसुदा तयार केला जावा, जेणेकरून भविष्यात कोणतीही नवीन कायदेशीर गुंतागुंत निर्माण होणार नाही. या प्रक्रियेत केवळ देवस्थानच्या मालमत्तेचे रक्षण करणे हाच एकमेव उद्देश नसावा, तर याद्वारे सर्वसामान्यांच्या अडचणी वाढणार नाहीत याची दक्षता घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. राज्यभरातून या धोरणावर आलेल्या हजारो हरकती आणि सूचना हेच दर्शवतात की, जनतेचा या विषयाशी थेट आणि जिव्हाळ्याचा संबंध आहे. पुणे, नाशिक, कोकण आणि नागपूर विभागांतून आलेल्या या सूचनांचा अभ्यास करूनच अंतिम निर्णय घेतला पाहिजे. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा आणि मानवी दृष्टिकोनाचा भाग म्हणजे, देवस्थानच्या जमिनींवर वर्षानुवर्षे वसलेली गावठाणे, वाड्या आणि पाडे हा आहे. विशेषतः कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये अशी अनेक जुनी गावठाणे आहेत, जिथे पिढ्यानपिढ्या नागरिक राहत आहेत. या नागरिकांना उघड्यावर न पाडता, त्यांच्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना हक्काचे कायदेशीर संरक्षण देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. या जमिनींवरून कोणावरही अन्याय होऊ नये, यासाठी ऐतिहासिक, कायदेशीर आणि विभागीय अशा तीन विशेष कृती गटांची स्थापना करण्याचा निर्णय अत्यंत योग्य आणि दिशादर्शक ठरतो. हा कायदा अधिक परिपूर्ण करण्यासाठी इतर राज्यांतील वेगवेगळ्या कायद्यांचा आणि सध्याच्या कायदेशीर बाबींचा सखोल अभ्यास केला जाणार आहे, ही सकारात्मक बाब आहे. एकाच वेळी सर्व विषयांना हात न घालता, एक-एक विषय घेऊन त्यावर सविस्तर चर्चा करण्याचे समितीचे धोरण कामाला अचूकता देईल. या नव्या कायद्यामुळे देवस्थानच्या जमिनींची होणारी अवैध विक्री किंवा गैरवापर थांबेलच, पण त्याचसोबत तिथे राहणाऱ्या गरिबांना आणि शेतकऱ्यांनाही दिलासा मिळेल. महसूल विभाग आणि देवस्थान समित्यांच्या अशासकीय सदस्यांनी एकत्र येऊन हा प्रश्न वेळेत निकाली काढल्यास, राज्यातील देवस्थान संस्कृतीचे रक्षण तर होईलच, पण ग्रामीण भागातील जमिनींचे वादही कायमचे मिटतील.

## घाटीत देहदान चळवळीला नवी गती; 89 वर्षीय व्यक्तीचा देह वैद्यकीय शिक्षणासाठी स्वीकारला



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मानवतेच्या सेवेसाठी मृत्यूनंतरही योगदान देण्याचा सर्वोच्च आदर्श म्हणजे देहदान. बजाजनगर येथील स्व. रावसाहेब बोर्डे (वय ८९) यांनी काही वर्षांपूर्वी देहदानाचा संकल्प करून त्याची अधिकृत नोंदणी केली होती. त्यांच्या निधनानंतर कुटुंबीयांनी त्यांच्या अंतिम इच्छेचा सन्मान राखत त्यांचा देह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील शरीररचनाशास्त्र विभागाकडे वैद्यकीय शिक्षणासाठी सुपूर्द केला.

या घटनेचे विशेष महत्त्व असे की, स्व. बोर्डे यांच्या मृतदेहाचे कायदेशीर प्रक्रियेनुसार शवविच्छेदन (पोस्टमार्टम) झालेले होते. तरीही घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे आणि शरीररचनाशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. अर्चना कल्याणकर-तुंगेनवार यांच्या पुढाकारामुळे हा देह वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण व संशोधनासाठी स्वीकारण्यात आला.

अनेक वर्षांनंतर शरीररचनाशास्त्र विभागाने पोस्टमार्टम झालेला देह शैक्षणिक हेतूने स्वीकारल्याची ही महत्त्वपूर्ण घटना मानली जात आहे. वैद्यकीय विद्यार्थ्यांना मानवी शरीररचनेचा सखोल अभ्यास करण्यासाठी तसेच संशोधनासाठी अशा देहदानाचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले.

**देहदानाचे महत्त्व वैद्यकीय शिक्षणामध्ये देहदान केलेले मृतदेह विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष अभ्यासाचे प्रभावी माध्यम ठरतात. यामुळे भविष्यात कुशल, संवेदनशील आणि जबाबदार डॉक्टर घडण्यास मदत होते. त्यामुळे समाजात देहदानाबाबत जनजागृती होणे आणि अधिकाधिक नागरिकांनी या चळवळीत सहभागी होणे आवश्यक असल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांचे मत आहे.**

यासंदर्भात विभागाने स्पष्ट केले की, ज्या व्यक्तींनी देहदानाची पूर्वनोंदणी केली आहे आणि त्यांच्या निधनानंतर काही कायदेशीर कारणांमुळे शवविच्छेदन करावे लागले, अशा प्रकरणांमध्ये आवश्यक वैद्यकीय व कायदेशीर निकषांची पूर्तता होत असल्यास संबंधित देह शिक्षण, अस्थी अभ्यास आणि संशोधनासाठी स्वीकारले जाऊ शकतात.

दुःखाच्या प्रसंगातही स्व. बोर्डे यांच्या कुटुंबीयांनी त्यांची अंतिम इच्छा पूर्ण करून समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. या वेळी डॉ. अनंत धनवटे, डॉ. हिजाब अख्तर, डॉ. पल्लवी चव्हाण, निवासी डॉक्टर, ट्यूटर तसेच गुड्डू आदी उपस्थित होते.

## "पंचतंत्राची आजची उपयुक्तता"

मित्रांनो,

रोजचे राजकारण पाहून; त्यावर आगपाखड करणारे विरोधक पाहून; त्याला योग्यायोग्यतेच्या निकषावर उलटसुलट पारखून पाहणारे सामान्य जन पाहून; पूर्वीचे राजे कसे काय राज्य करीत होते? त्याची नीती कशी होती? अयोग्य काय ? योग्य काय हे पूर्वी कसे ठरवले जाई हा विचार मनात आला आणि पंचतंत्राच्या पहिल्या तंत्राच्या शेवटी त्याचे उत्तर मिळाले (गीतेत वा इतर ग्रंथातही आहेच मी पंचतंत्र अजूनही मार्गदर्शक ठरू शकते का जुने झाले म्हणून पाहिले ) आणि पंचतंत्र आजही तितकेच समर्पक, तितकेच योग्य आहे, किंबहुना माणूस बदलला म्हटलं तरी माणसाचा मूळ स्वभाव हजारो वर्ष झाली तरी तसाच आहे हे लक्षात येईल. जणु आजचे प्रसंग हजारो वर्षांपूर्वी असेच घडले असावेत असं वाटलं.

एकेकाळी आपल्या प्राणप्रिय मित्र असलेल्या पण नंतर विरोधात गेलेल्या मित्ररूपी शत्रूला राजाने ठार मारल्यावर दुःखी झालेल्या राजाला समजावतांना त्याचा मंत्री काय म्हणतो, काय उपदेश करतो ते मराठीत देत आहे;

(आज ठार मारायची आवश्यकता नाही. निवडणूकीत हरवणे हे मरणसदृशच असते. अशी हार विरोधकांस जिवंतपणी मरण बघणे वा जखमेवर मीठ चोळण्यासारखी असते ;तर सत्तेतील पक्षांना आतून खुदु खुदु हसू आणणारी असते. )

पिता माता मुले भाऊ । पत्नी वा खास मित्रही
उठले प्राण घेण्यासी । विश्वास तोडुनी जरी ।।
457.1 ।।
प्राणद्रोह्यांस ह्या शिक्षा । करावी लागतेच ती
तयांना ठार मारीता । पाप ना लागते मुळी ।। 457.2 ।।

मंत्री म्हणतो, आणखी असं म्हणेन की, अपराध्याची दया येऊन त्याला सोडून देणारा राजा, आचार विचारांचं बंधन नसलेला उच्छृंखल सर्वभक्षी ब्राह्मण, लाज लज्जा सोडलेली स्त्री, दुष्ट मित्र वा सेवक, राजाच्या विरोधी वागणारा दूत, जबाबदर्यांकडे दुर्लक्ष करणारा अत्यंत हलगर्जी, निष्काळजी अधिकारी आणि कृतघ्न ह्या सर्व व्यक्ती त्याग करण्याच्याच लायकीच्या असतात. (458)

ना दंडितो भूपति जो दयेने । दोषी, गुन्हेगारच पातक्यांसी; ।
त्यासी पदच्यूत करणे बरेची । सार्या प्रजेने एकमते मिळूनी ।। 458.1 ।।
तैसाच तो ब्राह्मण सर्वभक्षी । निर्लज्ज स्त्री; सेवक दुष्टबुद्धी; ।
वा राजद्रोही करि कारवाया । त्या हाकलावे नित राजदूता ।। 458.2 ।।
उन्मत्त तैसाच पदाधिकारी । निष्काळजी जो करितो चुकांसी ।
तैसा त्यजावाच कृतघ्न कोणी । जो ना स्मरेची उपकार काही ।। 458.3 ।।

अजून सांगतो.

राजानीती ही वेश्यांप्रमाणे बहुरूपिणी असते. जसं कामं असेल त्यानुसार कधी सत्याचा मार्ग अवलंबावा लागतो तर कधी धडधडीत खोटंही बोलावं लागतं. कधी अत्यंत कठोरपणे वागावं लागतं तर कधी अगदी मृदु, गोड बोलून आपलं काम काढून घ्यायला लागतं. करवून घ्यायला लागतं. कधी दयाळु व्हावं लागतं तर कधी हिंसेचा मार्गही अवलंबावा लागतो. कधी दानशूर उदार व्हावं लागतं तर कधी अत्यंत काटकसरी, कृपण वा आसक्त अति लोभीही व्हायला लागतं. कधी उदारपणे पाण्यासारखा पैसा खर्च करावा लागतो तर कधी राजकोष भरलेला राहण्यासाठी धनसंग्रहाच्या कामी स्वतःला झोकून घ्यायला लागतं. कधी खूप खर्च करावा लागतो तर कधी उत्पन्नाची साधनं कशी वाढतील ह्याच्यासाठी अखंड कार्यरत असायला लागतं. (459)

कार्यानुसार नृप वागतसे निराळे
वागे बनावट कधी; कधि सत्य बोले
वागे कठोर कधि कार्य करून घेता
लोण्यासमान मृदु होत असे कधी वा ।। 459.1 ।।

मिठ्ठास बोलुन कधी गुपितेच काढी
साधे स्वकार्य मुलायम वागण्यानी ।
पोटी धरे कधि कुणास दयार्द्रतेने
वा घातही करतसे अति क्रूरतेने ।। 459.2 ।।

कंजूस होउन कधी नच देइ कौडी
देई उदार बनुनी कधि स्वर्ण हंडी ।
पाण्यासमा कधिच ओततसेचि पैसा
आटापिटा नित करी खजिना भराया ।। 459.3 ।।

नाना कळा चतुरता मुरवून अंगी
सौंदर्य वापरुन करे नर जायबंदी ।,
राखे गिर्हाइक जशी गणिका खुबीने
ही राजनीतिच तशी बहुरूपिणी गे ।। 459.4 ।।

मंत्री राजाला परत सांगतो,

अत्यंत श्रेष्ठ पदावर असलेला थोर महान मानव जरी असला; पण तो शांत, संयमी, साधा भोळा राहिला तर लोक त्याला आदराने वागवत नाहीत. योग्य तो मान सन्मान देत नाहीत. पण तोच जर जाचक, पीडादायी, हुकुमत गाजवणारा असेल तर लोक त्याला देवासमान मान देऊन त्याची पूजा करायलाही मागेपुढे बघत नाहीत. सर्पभक्षी गरुड (माणसासाठी अत्यंत घातक अशा सर्पांना खाऊन मानवावर उपकार करत असूनही) मानव जातीला कुठला त्रास देत नाही शांत असतो; त्याची कोणी पूजा करत नाहीत पण जे विषारी साप डसतात, अत्यंत हानी पोचवतात, उपद्रवी असतात; त्या सापांची लोक मनोभावे पूजा करतात. (460)

उपद्रवी नसे जोची । जगी श्रेष्ठ असूनही ।
विचारे न तया कोणी । मानसन्मान कोठुनी ।।
460.1 ।।
विषारी सर्प खाणार्या । गरूडास न पूजिती
डसणार्याच सर्पांसी । आदरे लोक पूजिती ।।
460.2 ।।

- अरुंधती प्रवीण दीक्षित-

## स्वतःची मुले गमावूनही कोट्यवधी बहुजनांना स्वाभिमानाचे जीवन देणारे आमचे बाबा : भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर

*"स्वतःची मुले गमावूनही आम्हा करोडोंना जीवन आणि स्वाभिमानाचा मार्ग दाखवणारे, संपूर्ण बहुजन समाजाचे खरे आधारवड व उद्धारकर्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना फादर्स डे निमित्त कोटी कोटी वंदन!"*

वडील म्हणजे केवळ जन्म देणारी व्यक्ती नव्हे, तर आपल्या संततीच्या उज्वल भविष्यासाठी स्वतःचे सुख-दुःख, इच्छा-आकांक्षा आणि संपूर्ण आयुष्य अर्पण करणारे व्यक्तिमत्त्व होय. प्रत्येकाच्या जीवनात वडिलांचे स्थान अनन्यसाधारण असते. ते मुलांना केवळ जगण्याची साधने देत नाहीत, तर जगण्याची दिशा आणि मूल्येही देतात. म्हणूनच फादर्स डे हा केवळ आपल्या जैविक वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस नसून, ज्यांनी लाखो-कोट्यवधी लोकांचे जीवन घडवले, त्यांनाही स्मरण करण्याचा दिवस आहे.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे असेच एक महामानव होते, ज्यांनी स्वतःच्या वैयक्तिक आयुष्यातील असंख्य दुःख आणि संघर्ष सहन करत संपूर्ण बहुजन समाजाचे पितृतुल्य नेतृत्व केले. त्यांनी स्वतःची मुले गमावली, संसारातील वेदना भोगल्या, परंतु त्या दुःखाला कधीही आपल्या ध्येयाच्या आड येऊ दिले नाही. उलट आपल्या लेकरांना गमावलेल्या त्या पित्याने कोट्यवधी वंचित, शोषित, उपेक्षित आणि दलित समाजाला आपली संतती मानले आणि त्यांच्या उन्नतीसाठी संपूर्ण आयुष्य वेचले. तसे त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातही अनेक दुःखद प्रसंग आले. त्यांच्या अनेक मुलांचा अल्पवयात मृत्यू झाला. एका पित्याच्या आयुष्यातील ही सर्वात मोठी शोकांतिका असते. स्वतःच्या लेकरांना गमावण्याची वेदना शब्दांत मांडता येत नाही. पण बाबासाहेबांनी या वैयक्तिक दुःखाला समाजाच्या सेवेसाठी प्रेरणेत रूपांतरित केले. त्यांनी आपल्या अश्रूंना संघर्षाचे सामर्थ्य बनवले आणि संपूर्ण समाजाला आपल्या लेकरांप्रमाणे स्वीकारले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन हे त्याग, संघर्ष आणि सामाजिक बांधिलकीचे सर्वोच्च उदाहरण आहे. एका गरीब कुटुंबात जन्मलेल्या या बालकाने जातीय अपमान, भेदभाव आणि सामाजिक बहिष्कार सहन केला. परंतु त्यांनी या अन्यायाविरुद्ध रडण्याऐवजी शिक्षणाचे शस्त्र हाती घेतले.कारण त्यांना माहीत होते की,अज्ञान ही गुलामीची जननी आहे आणि शिक्षण हे मुक्तीचे द्वारआहे.

डॉ.बाबासाहेबांनी जगातील सर्वोच्च विद्यापीठांमधून शिक्षण घेऊनही त्यांनी वैयक्तिक सुखाचा मार्ग निवडला नाही. ते सहजपणे परदेशात उच्च पदांवर राहू शकले असते. संपन्न आणि ऐश्वर्यपूर्ण जीवन जगू शकले असते. परंतु त्यांनी भारतातील वंचित जनतेच्या उद्धारासाठी आपले संपूर्ण ज्ञान, बुद्धिमत्ता आणि आयुष्य समर्पित केले. हे कार्य एखाद्या सामान्य नेत्याचे नव्हते; हे कार्य एका खऱ्या पित्याचे होते.प्रत्येक पिता आपल्या मुलांच्या भविष्यासाठी चिंतित असतो. बाबासाहेबांची चिंता मात्र एका घरापुरती मर्यादित नव्हती. त्यांना संपूर्ण समाजाचे भविष्य घडवायचे होते. म्हणूनच त्यांनी "शिका, संघटित व्हा



आणि संघर्ष करा" हा मंत्र दिला. हा मंत्र म्हणजे बहुजन समाजासाठी त्यांनी दिलेला जीवनमार्ग होता. जसा पिता आपल्या मुलाला योग्य मार्ग दाखवतो, तसेच बाबासाहेबांनी संपूर्ण समाजाला स्वाभिमान, आत्मविश्वास आणि प्रगतीचा मार्ग दाखवला.आज आपण संविधानामुळे समानतेचे हक्क उपभोगत आहोत. मतदानाचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार, सामाजिक न्याय, आरक्षण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठा यांची हमी मिळत आहे. या सर्व अधिकारांच्या मागे बाबासाहेबांची दूरदृष्टी आणि अथक परिश्रम आहेत. त्यांनी केवळ संविधान लिहिले नाही, तर भारतातील प्रत्येक सामान्य माणसाच्या स्वाभिमानाचे रक्षण करणारा दस्तऐवज निर्माण केला.विशेषतः महिलांच्या अधिकारांसाठी बाबासाहेबांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, "एखाद्या समाजाची प्रगती मी त्या समाजातील महिलांनी केलेल्या प्रगतीवरून मोजतो." त्या काळात जेव्हा महिलांना अनेक मूलभूत अधिकार नाकारले जात होते, तेव्हा बाबासाहेबांनी त्यांच्यासाठी समानतेची लढाई लढली. एक खरा पिता जसा आपल्या मुलीच्या सुरक्षित आणि सन्मानजनक भविष्यासाठी झटतो, तसाच बाबासाहेबांचा दृष्टिकोन संपूर्ण स्त्री समाजासाठी होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैयक्तिक जीवन पाहिले तर त्यात दुःखांचे डोंगर दिसतात. त्यांच्या अनेक अपत्यांचा अकाली मृत्यू झाला. एक पित्याच्या हृदयाला यापेक्षा मोठा आघात कोणता असू शकतो? परंतु या वेदनेतही त्यांनी समाजकार्याचा मार्ग सोडला नाही. स्वतःच्या दुःखाला बाजूला ठेवून त्यांनी कोट्यवधी लोकांच्या दुःखावर फुंकर घालण्याचे कार्य केले.याच कारणामुळे आज बहुजन समाज त्यांना केवळ नेता किंवा संविधान निर्माता म्हणून पाहत नाही, तर "आधारवड" बाप माणूस म्हणून पाहतो. कारण त्यांनी समाजाला केवळ अधिकार दिले नाहीत, तर आत्मसन्मान दिला. त्यांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून दिला. गुलामीच्या मानसिकतेतून बाहेर काढून स्वाभिमानाने उभे राहण्याची ताकद दिली. शतकानुशतके गुलामी, अज्ञान आणि अन्याय सहन करणाऱ्या बहुजन समाजाला त्यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी सांगितले "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा." हे केवळ घोषवाक्य नव्हते; तर बहुजन समाजाच्या पुनर्जन्माचा मंत्र होता.आज बहुजनाचे लाखो युवक डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, वकील, प्रशासकीय अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील यशस्वी व्यक्तिमत्त्वे बनले आहेत. यामागे बाबासाहेबांनी पेटवलेली शिक्षणाची ज्योत आहे. म्हणूनच बहुजन समाजातील प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या यशामागे बाबासाहेबांचे योगदान आहे. बाबासाहेब यांनी स्वतःच्या वैयक्तिक दुःखावर मात करून कोट्यवधी लोकांच्या जीवनात आशेचा सूर्य उगवला. त्यांनी आम्हाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला, शिक्षणाची वाट दाखवली, स्वाभिमानाचे बळ दिले आणि संविधानाच्या माध्यमातून सुरक्षित भविष्य दिले. म्हणूनच बहुजन समाजासाठी बाबासाहेब हे केवळ नेते नाहीत, तर "आमचे बाबा" आहेत. ज्यांनी स्वतःची मुले गमावली, पण कोट्यवधी लोकांना आपल्या प्रेमाने, विचारांनी आणि संघर्षाने नवे जीवन दिले.काल झालेल्या फादर्स डेच्या निमित्ताने आपण आपल्या वडिलांना आठवतो, त्यांचे ऋण मान्य करतो. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रतीही कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. कारण जर बाबासाहेब नसते, तर आज लाखो लोकांना शिक्षण, नोकरी, सामाजिक प्रतिष्ठा आणि घटनात्मक हक्क मिळाले नसते. अनेकांचे जीवन अंधारातच राहिले असते. आजच्या पिढीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे बाबासाहेबांचा वारसा समजून घेणे आणि जपणे. त्यांच्या प्रतिमेला हार घालणे, जयभीम म्हणणे किंवा मिरवणुका काढणे यापेक्षा त्यांच्या विचारांचे आचरण करणे अधिक महत्त्वाचे आहे. शिक्षण घेणे, वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे, अंधश्रद्धा दूर करणे, समाजात समता आणि बंधुभाव निर्माण करणे, हेच बाबासाहेबांना खरे अभिवादन ठरेल.

फादर्स डे हा केवळ भावनिक उत्सव नाही; तो आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचे स्मरण करण्याचा दिवस आहे. आणि या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याइतके महान पितृतुल्य व्यक्तिमत्त्व दुसरे क्वचितच आढळेल. त्यांनी स्वतःच्या आयुष्यातील दुःख, संघर्ष आणि त्याग यांना समाजाच्या उज्वल भविष्यासाठी अर्पण केले."बाबासाहेब, तुम्ही आम्हाला जन्म दिला नाही; पण माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिलात. म्हणूनच तुम्ही आमचे खरे बाबा आहात." आज आपण बाबासाहेबांच्या चरणी कृतज्ञतेची पुष्पे अर्पण करताना एक संकल्प करूया शिक्षणाचा दीप प्रज्वलित ठेवू, अन्यायाविरुद्ध आवाज उठवू, संविधानिक मूल्यांचे रक्षण करू आणि स्वाभिमानाने जगणारा समाज घडवू. कारण हेच बाबासाहेबांचे स्वप्न होते आणि हेच त्यांना दिलेले सर्वोत्तम अभिवादन ठरेल. काल झालेल्या फादर्स डेच्या पावन निमित्ताने कोट्यवधी बहुजनांच्या जीवनात स्वाभिमान, समानता, शिक्षण आणि मानवतेचा प्रकाश पसरविणारे, स्वतःची मुले गमावूनही आम्हा सर्वांना जीवन जगण्याची नवी दिशा देणारे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या युगपुरुषाला विनम्र अभिवादन आणि कोटी कोटी वंदन!

जय भीम! जय संविधान!

**लेखक - समाजभूषण**
**रामदास वाघमारे**
**छत्रपती संभाजीनगर**
**संपर्क क्र. 8888125610**

## "अशोक भवार यांचा काव्यमुदिता कवितासंग्रह बुद्ध, धम्म, समता, करुणा आणि मानवतेचा संदेश देणारा" - नवनाथ रणखांबे

मुंबई, प्रतिनिधी : पांचपीर ट्रस्ट कार्यक्षेत्र भारत यांच्या वतीने आयोजित सार्थक साहित्य प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या कवी अशोक भवार यांच्या 'काव्यमुदिता' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक व विचारवंत नवनाथ रणखांबे होते. यावेळी सार्थक साहित्य प्रकाशनाच्या संचालिका प्रा. आशा नवनाथ रणखांबे, पांचपीर ट्रस्टचे संचालक तथा साहित्यिक शाम परशुराम बैसाणे आणि बौद्ध विकास मंडळ पवईचे अध्यक्ष भाऊ पंडागळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आणि मानवतावादी निमंत्रित कवी संमेलन ज्येष्ठ कवी बबन सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रमणी बुद्धविहार, आयआयटी मेनगेट, पवई येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. शुक्राचार्य गायकवाड यांनी याप्रसंगी बोलताना, "कविता बाहेर येते त्यावेळी ती कविता समाजाची होते. अशोक भवार यांच्या काव्य मुदिता या संग्रहातील कविता परिवर्तनाच्या, बदलाच्या आणि धम्माच्या आहेत." असे गौरव उद्गार काढून उपस्थितांना मार्गदर्शन केले. तर अध्यक्षीय भाषणात साहित्यिक तथा विचारवंत नवनाथ रणखांबे यांनी, "कवी अशोक भवार यांचा काव्य मुदिता कवितासंग्रह बुद्ध, धम्म, समता, करुणा आणि मानवतेचा संदेश देणारा विचारांचा दस्तऐवज आहे. त्यांच्या संवेदनशील लेखणीतून समाजातील वेदना, संघर्ष, प्रेम, नातेसंबंध, स्त्री-सन्मान, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक प्रबोधन यांचे चित्रण झाले आहे," असे गौरवोद्गार काढले. उपस्थित





साहित्यिक, कवी आणि रसिकांना मार्गदर्शन करताना रणखांबे पुढे म्हणाले की, "साहित्य हे माणसे जोडणारे असले पाहिजे. लेखक आणि कवींनी कोण काय म्हणेल याचा विचार न करता मानवतावादी, परिवर्तनवादी आणि समाजप्रबोधन करणारे साहित्य निर्माण करावे. दर्जेदार साहित्य नेहमी वाचले जाते. त्यामुळे साहित्यिकांनी स्वतःचा वाचकवर्ग निर्माण करण्यासाठी सातत्याने लेखन, वाचन आणि चिंतन करणे आवश्यक आहे." असे प्रतिपादन करून त्यांनी कवी अशोक भवार यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तर प्रकाशिका प्रा. आशा रणखांबे यावेळी बोलताना म्हणाल्या, "लेखकाच्या विचारांना दर्जेदार पुस्तकाचे रूप देणे ही सार्थक साहित्य प्रकाशनाची बांधिलकी आहे. 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर कार्य करत आम्ही साहित्यिकांना गुणवत्तापूर्ण प्रकाशनाची संधी उपलब्ध करून देत आहोत. त्यामुळे नवोदित आणि ज्येष्ठ साहित्यिकांनी याचा लाभ घ्यावा." तर शाम बैसाणे यावेळी बोलताना म्हणाले, "कवी अशोक भवार यांनी सामाजिक बांधिलकी आणि प्रबोधनाची परंपरा कवितांमधून जिवंत ठेवण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. सार्थक साहित्य प्रकाशनाने हा कवितासंग्रह दर्जेदार बनवला आहे." यावेळी भाऊ पंडागळे यांनी अशोक भवार यांना त्यांच्या पुस्तक प्रकाशनानिमित्ताने शुभेच्छा देऊन पुढील वाटचालीस अभिनंदन केले.

पुस्तक प्रकाशनानंतर आयोजित मानवतावादी निमंत्रित कवी संमेलन जेष्ठ कवी बबन सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी मानवतावादी काव्यमंच्यावर नवनाथ रणखांबे, शाम बैसाणे, अशोक भवार, संतोष नरवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्ष आणि प्रमुख मान्यवरांसह अनंत धनसरे, धनंजय सरोदे, संदेश कर्डक, के. पुरुषोत्तम, प्रतीक कांबळे, सुरेखा गायकवाड, डॉ. सुशील बैसाणे, विकास भंडारे, वसंत हिरे, बाळासाहेब जोंधळे, वसंत वाघमारे, सुरेश घोडगे, जयलाभ धन पैठने, विश्वास कांबळे, महेश सावंत आदी. कवींनी आपल्या कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सुरेखा गायकवाड यांनी केले. मानवता, सामाजिक समता, बंधुता, प्रेम, करुणा आणि परिवर्तनवादी विचारांनी परिपूर्ण कवितांमुळे संपूर्ण सभागृह काव्यमय झाले. उपस्थित साहित्यप्रेमी आणि रसिकांनी कवींच्या सादरीकरणास उत्स्फूर्त

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# आऊसाहेब सेवा प्रतिष्ठान व लाईफ फिटनेस जिमतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** आऊसाहेब सेवा प्रतिष्ठान आणि लाईफ फिटनेस जिम यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या डॉ. दिव्या पाटील यांनी योगाचे महत्त्व आणि आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यामागील उद्देश याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नसून शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणारी जीवनशैली असल्याचे त्यांनी सांगितले.

आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात योगाची गरज अधिक अधोरेखित होत असून नियमित योगाभ्यासामुळे मानसिक शांतता, एकाग्रता, सकारात्मकता आणि शारीरिक तंदुरुस्ती प्राप्त होते, असे त्यांनी नमूद केले. अनेक आजारांपासून दूर राहण्यासाठी तसेच निरोगी जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यानंतर योग प्रशिक्षक सोनाली बोरसे यांनी उपस्थितांना विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी उत्साहाने योगाभ्यास करत कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

# एलोरा इंग्रजी स्कूलमध्ये जागतिक योग व संगीत दिन उत्साहात साजरा



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** बीड बायपास रोडवरील एलोरा इंग्रजी हायस्कूल व सायन्स ज्युनिअर कॉलेजमध्ये जागतिक योग दिन आणि जागतिक संगीत दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांना योगाचे विविध प्रकार, त्यांची योग्य पद्धत आणि आरोग्यासाठी होणारे फायदे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध योगासने सादर करून योगाचे महत्त्व अधोरेखित केले. योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते, तसेच एकाग्रता आणि सकारात्मकता वाढते, असे मार्गदर्शन उपस्थित मान्यवरांनी केले.

संगीत दिनानिमित्त शास्त्रीय बंदिशी, अभंग आणि विविध संगीत रचना सादर करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

कार्यक्रमाचे उद्घाटन अशोक तांबटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता शिंदे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. वैष्णवी काथार यांनी विद्यार्थ्यांना योग व संगीताचे जीवनातील महत्त्व पटवून दिले. योग प्रशिक्षक सचिन काळे यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासनांचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले, तर संगीत शिक्षक दत्तात्रय गवारे यांनी विविध गीतांचे सादरीकरण करून कार्यक्रमात रंगत आणली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पर्यवेक्षिका हरजितकौर सौदी, निलाक्षी राव, स्वाती देशमुख, वेदिका इंगळे आणि योगिता सूर्यवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# एच. जी. फाउंडेशनच्या CSR उपक्रमातून विद्यार्थ्यांना योगाचे धडे



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**रांजणगाव पोळ :** एच. जी. फाउंडेशनच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) उपक्रमांतर्गत संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. रांजणगाव पोळ व पोटूल येथील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक दाखवून नियमित योगाभ्यासाचे महत्त्व पटवून देण्यात आले. योगामुळे शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासाला चालना मिळते, शरीर सुदृढ राहते, मन शांत राहते तसेच एकाग्रता वाढून तणाव कमी होण्यास मदत होते, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने आणि प्राणायामाचा सराव केला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि योगाविषयीची उत्सुकता विशेष लक्षवेधी ठरली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण झाली असून नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प अनेकांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचे श्री. सचिन लिमकर, श्री. सचिन डहाळे आणि श्री. प्रथमेश हिवाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच दोन्ही शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नियोजन आणि अंमलबजावणीत मोलाचे सहकार्य केले.

यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करून निरोगी, सुदृढ आणि संतुलित जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी नियमित योगाभ्यास करण्याची प्रतिज्ञा घेतली.

एच. जी. फाउंडेशनच्या CSR उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढण्यासह योग संस्कृतीच्या प्रसाराला चालना मिळणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## गुणवंतांचा सन्मान, समाजसेवकांचा गौरव; विश्वकर्मा समाजाच्या उपक्रमाने दिला शिक्षणाचा संदेश

# 100 हून अधिक विद्यार्थ्यांचा सत्कार; 10 मान्यवरांना 'समाजभूषण' पुरस्कार प्रदान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम घडविणारा विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेचा गुणवंत विद्यार्थी सत्कार व समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. समाजातील शैक्षणिक प्रगतीला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात दहावी, बारावी आणि विविध शैक्षणिक क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या १०० हून अधिक विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच समाजासाठी विविध क्षेत्रांत भरीव योगदान देणाऱ्या १० मान्यवरांना 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परमेश्वर पांचाळ होते. उद्घाटक म्हणून संत नरहरी महाराज मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष संजय शहाणे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून गरुड झेप अकादमीचे संचालक नीलेश सोनवणे, प्राचार्य तानाजी शेटे, माजी अपर जिल्हाधिकारी के. बी. गवळी, स्वामी विवेकानंद अकादमीचे आबासाहेब सिरसाठ, वाळूज सोनार संघटनेचे अध्यक्ष शिवानंद थोरकर, राज्य सचिव विलास पवार आणि उपाध्यक्ष गोपाल राऊत यांची उपस्थिती लाभली.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नीलेश सोनवणे यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. "यशस्वी करिअर घडविण्यासोबतच शिक्षण व्यक्तिमत्त्व विकासाचेही प्रभावी साधन आहे. मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत," असे त्यांनी सांगितले. तसेच पालकांनी मुलांमध्ये सकारात्मक विचार, शिस्त आणि उत्तम संस्कार रुजविण्याचे आवाहन केले.

सोहळ्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव होताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन केले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशामुळे पालकांमध्येही समाधान आणि अभिमानाचे वातावरण पाहायला मिळाले.

यावेळी अर्जुन महाराज पांचाळ, विनोद महाराज जाधव, विद्याताई रणमले, पोलिस उपनिरीक्षक प्रवीण पाथरकर, आबासाहेब सिरसाठ, वैभव सालपे, गणेश माहूरकर, सुरेखा दुधडेकर, ज्ञानदेव डोरले आणि दादुलाल बोरकर यांना 'समाजभूषण' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सामाजिक, शैक्षणिक आणि जनसेवेच्या क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्याध्यक्ष अरुण भालेकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परमेश्वर पांचाळ, सोमनाथ राऊत, बालाजी पांचाळ, कल्याण घुसळकर, गोपाल महामुनी, व्यंकट पांचाळ, दामोदर पांचाळ, संतोष भांडेकर, अमोल डोळस, शिवाजी पांचाळ, चंदू हिवाळे, अविनाश पांचाळ, ज्ञानेश्वर पांचाळ, भगवान राऊत, चंदन शर्मा, नारायण पांचाळ यांच्यासह संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# एमजीएममध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

## 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या संकल्पनेवर आधारित विशेष योग उत्सव; विद्यार्थी, प्राध्यापकांचा उत्स्फूर्त सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या योग विज्ञान विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या चिंतनगाह येथे विशेष योग उत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि विद्यापीठातील अधिकारी वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमात आयुष मंत्रालय, भारत सरकार यांनी सुचविलेल्या पूरक हालचाली, विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यान यांचा सराव योगशिक्षक गंगाप्रसाद खरात यांनी उपस्थितांना करून घेतला. आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एक तासाचे प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते. या सत्रात सूक्ष्म व्यायाम, योगासने, प्राणायाम व ध्यान यांचा समावेश करण्यात आला. यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही योग विज्ञान, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने 'योग आठवडा' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाने यावर्षी आंतरराष्ट्रीय योग दिनासाठी 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' (Yoga for Healthy Ageing) ही संकल्पना निश्चित केली असून, त्यानुसार विविध उपक्रम राबविण्यात आले.

# संदीप हिवराळे यांना पाली आणि बुद्धीझम विषयात पीएच.डी पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पाली आणि बुद्धीझम विभागातून संदिप वामन हिवराळे यांनी पाली आणि बुद्धीझम विषयात पीएच.डी पूर्ण केली आहे. त्यांनी गेवराई (जि.बीड) येथील महिला महाविद्यालयाच्या प्रो.डॉ. कांचन पी. परळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली "डॉ, बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादिलेला बुद्ध धम्म - एक अभ्यास" या विषयावर संशोधन केले कार्य पूर्ण केले आहे. त्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने त्यांना नुकतीच पीएच.डी पदवी प्रदान केली आहे. त्याबद्दल प्रो.डॉ. एम सत्यपाल भन्ते, पाली आणी बुद्धिझम विभागाचे विभागप्रमुख प्रो डॉ. शशांक सोनवणे, आतरविदयाशाखीय अधिष्ठाता डॉ. वैशाली खापर्डे प्रो. डॉ. प्रशांत पगारे, डॉ. जयशिला संदिप हिवराळे, डॉ. संजय आवारे, डॉ गौतम प्रधान, सुलीनंद दाभाडे, मंगल दाभाडे, गजानन लांडगे, अंकुश जाधव आदींनी संदीप हिवराळे यांचे अभिनंदन केले.

# अय्युब पठाण यांच्या " कौतुकाची थाप " कथेचा चौथीच्या अभ्यासक्रमात समावेश



**छत्रपती संभाजीनगर :-** ( प्रतिनिधी ) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बालभारतीच्या अभ्यासक्रमाची निर्मिती जून २०२६ पासून करण्यात आलेली आहे.यामध्ये संपूर्ण महाराष्ट्र राज्यातल्या शाळेमध्ये इयत्ता चौथीच्या मराठी माध्यमातील पाठयपुस्तकात छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील लोहगाव ता. पैठण येथील प्रसिध्द व लोकप्रिय साहित्यिक श्री. अय्युब पठाण लोहगावकर यांच्या " कष्टाच्या वाटा " या बालकथा संग्रहातील प्रेरणादायी आणि संस्कारक्षम, शैक्षणिक मूल्यांवर आधारीत " कौतुकाची थाप " या कथेचा येत्या जून पासून चौथीच्या अभ्यासक्रमात समावेश बालभारतीने केला आहे.

नवीन वर्षात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार यावर्षी चौथीच्या पाठयपुस्तकाची बालभारतीच्या नेमलेल्या तज्ञ समितीकडून निर्मिती केलेली असून विद्यार्थी यांच्या अध्ययन निष्पतीवर आधारीत कौशल्याधिष्ठित शिक्षणावर अधिक भर देण्यात आलेला आहे. मराठवाडयातील प्रसिध्द साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांच्या विविध साहित्य निर्मितीची महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने योग्य दखल घेऊन श्री.अय्युब पठाण यांच्या " कौतुकाची थाप " या कथेचा समावेश इयत्ता चौथीच्या पाठयपुस्तकात करण्यात आलेला आहे. येत्या जून पासून हा अभ्यासक्रम लागू करण्यात येणार असून अय्युब पठाण लोहगावकर यांचा शैक्षणिक व साहित्यक्षेत्राकडून अभिनंदन होत आहे.

बँन्डमास्टर चे शाळामास्तर झालेले अय्युब पठाण हे सध्या सेवानिवृत्त शिक्षक असून त्यांच्या वयाच्या दुप्पट म्हणजे १२० विविध सेवाभावी सेवा आणि संघटना यांचे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार अय्युब पठाण लोहगावकर यांना प्राप्त झालेले आहे. श्री. अय्युब पठाण हे गेल्या चाळीस वर्षापासून मराठीभाषेत सातत्याने लेखन करून त्यांची आठ बालकवितासंग्रह, चार बालकथासंग्रह, तीन प्रौढ कवितासंग्रह आणि एक ललीतलेखसंग्रह अशी त्यांनी रससरशीत साहित्य संपदाची निर्मिती केलेली आहे. पाठयपुस्तकात त्यांच्या " कौतुकाची थाप " या पाठाचा समावेश झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मृग नक्षत्र गेले कोरडे, 'आर्द्रा' जिल्ह्यात शुभारंभीच बहुतांश ठिकाणी कोसळले

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा कायम असतानाच छत्रपती संभाजी नगर शहरासह जिल्ह्यात पावसाचा श्रीगणेशा झाला असून, काही ठिकाणी हलका, काही ठिकाणी मध्यम तर काही ठिकाणी रिमझिम पाऊस पडल्याचे वृत्त असून, एकूणच पावसाला पोषक हवामान तयार झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. मृग नक्षत्र पूर्णपणे कोरडे गेले असून, सोमवारी, २२ रोजी आर्द्रा नक्षत्राचे गाढवावरून आगमन झाले. सायंकाळी ४ वाजेनंतर वादळवारे सुरू झाले. आकाशात ढग दाटून आले आणि पावसाला प्रारंभ झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. नेहमीप्रमाणेच लेट खरीप साधण्याची शक्यता असून, शहर आणि जिल्ह्यात कपाशी, तूर, लागवड/पेरणी सुरू होईल, असे प्रगतिशील शेतकरी विष्णू कळसकर यांनी सांगितले.

**पेरणीयोग्य पावसाचे संकेत :** दरम्यान, सोमवारी जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी आर्द्रा नक्षत्राचा पाऊस झाला. पैठण, खुलताबाद आणि वैजापूर तालुक्यात दमदार, तर फुलंब्री आणि कन्नड तालुक्यात रिमरिम पाऊस झाला. सोयगाव, सिल्लोड आणि गंगापून तालुका अद्याप कोरडा असून, वाळूज पट्ट्यात हलका आणि करमाड भागात झिमझिम पाऊस झाल्याचे वृत्त आहे. २३, २५, २६ आणि २९ जून रोजी 'आर्द्रा'चा पाऊस होणार असल्याचे संकेत आहेत.

**मान्सूनची प्रगती शक्य :** ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे म्हणाले, नैऋत्य मोसमी वाऱ्यांच्या (मान्सून) प्रगतीसाठी पोषक हवामान तयार झाले आहे. काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस सुरू झाला असून, हंगामी कमी दाबाचा पट्टा पंजाबपासून बिहारपर्यंत कायम आहे. पूर्व उत्तर प्रदेश परिसरावर, तसेच रायलसीमा परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. उत्तर गुजरातपासून ते मध्य अरबी समुद्रापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा आहे. छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव या जिल्ह्यांत वादळी पावसाचा अंदाज असल्याने सतर्कतेचा इशारा म्हणून हवामान विभागाने 'येलो अलर्ट' दिला आहे.

# साने हॉस्पिटल व भारतीय जनता पार्टी सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत स्त्रीरोग व प्रसूती तपासणी शिबिराचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२२ जून :** साने हॉस्पिटल व भारतीय जनता पार्टी, सोयगाव शहर यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी दि.२३ मंगळवार रोजी ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथील कोविड सेंटरमध्ये मोफत स्त्रीरोग व प्रसूती तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ डॉ. मधुरी सानप (MBBS, DGO) या महिलांची तपासणी करून तज्ज्ञ मार्गदर्शन व समुपदेशन करणार आहेत.महिलांच्या विविध आरोग्य समस्यांवर सखोल सल्ला देण्यासोबत आवश्यक तपासण्याही करण्यात येणार आहेत.

शिबिरात मासिक पाळीच्या तक्रारी, गर्भधारणेपूर्व व गर्भधारणेदरम्यान मार्गदर्शन, वंध्यत्व (Infertility) समस्या, पांढरा स्त्राव, गर्भाशयाच्या तक्रारी, रजोनिवृत्ती (Menopause) संबंधित समस्या, गर्भवती महिलांची नियमित तपासणी, कुटुंब नियोजन सल्ला तसेच PCOS/PCOD तपासणी व मार्गदर्शन अशा विविध सेवांचा समावेश आहे. याशिवाय मोफत शुगर तपासणी, ECG तपासणी व औषधांचे वितरण करण्यात येणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या हस्ते होणार असून तेजस्विनी रोहित काळे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

महिलांनी आपल्या जुन्या वैद्यकीय अहवालांसह उपस्थित राहून या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.महिलांचे आरोग्य हे कुटुंबाच्या सुदृढतेचे आधारस्तंभ असून, वेळेवर निदान व उपचार हे उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले.

"सुदृढ महिला – सुदृढ कुटुंब" या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन साने हॉस्पिटल व भारतीय जनता पार्टी, सोयगाव शहर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# माधव शिंदे यांचे निधन



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२२ जून :** तालुक्यातील जरंडी येथील माधव झिपरू शिंदे(वय.७५) यांचे सोमवारी (दि.२२)सकाळी आठ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या वर दुपारी तिनला अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक मुलगा असा परिवार आहे.येथील व्यावसायिक कडूबा पाटील (डोलारे) यांचे ते मामा होते.

# अजिंठा येथे सवाऱ्याची स्थापना ; हिन्दू मुस्लिम एकतेची परंपरा दीडशे ते दोनशे वर्षापासून कायम!

## हिंदूंच्या 7, तर मुस्लीम बांधवांच्या 55 सवाऱ्या

हिंदूप्रकाश वार्ता / सलीम कुरेशी



अजिंठा येथे दीडशे वर्षपेक्षा जास्त वर्षाची परंपरा असलेल्या हिंदू-मुस्लीम एकतेचा राज्यभर संदेश देणाऱ्या मुस्लीम बांधवांच्या मोहरम सणाला सुरुवात झाली आहे. मोहरमला येथे विशेष महत्त्व आहे . मोहरम निमित्त अजिंठा शहरातील विविध ठिकाणी मंडप टाकून रविवारी (२१ जून ) रोजी संयकाळी अंदाजे ५८ ते ६० सवाऱ्यांची बसविण्यात आल्या आहे .यात हिंदू बांधवांनी ७ सवारिया बसवली आहे . हे विशेष आहे .या सणासाठी राज्यभरातून भावीक अजिंठा येथे येतात .मोठी आर्थिक उलाढाल होते .

***हिंदू मुस्लिम एकतेची परंपरा कायम :** हिंदू मुस्लिम एकतेचे दर्शन घडवणाऱ्या मोहरम सणाला येथे मंगळवारी संध्याकाळी चंद्रदर्शनानंतर मोहरमची एक तारीख अर्थात बुधवारी १७ जूनपासून मोहरम सणाला सुरुवात झाली आहे .

कुदळ मारण्याची परंपरिक विधी बुधवारी झाला असून रविवारी (२१ जून ) सयंकाळी नाले हैदर , बडे नाल साहब , छोटे नाल साहब, चाद साहाब, बने कासम , इमाम हसन हुसेन, पंजा , गरीब शाह अली , मोगल शाह वली, गैबनशाह वली असे सर्व ५८ ते ६० सवाऱ्या बसविण्यात आल्या आहेत .मंगळवारी (दि २३ ) आणि बुधवारी (दि. २४ ) रात्री अर्ध्या सवाऱ्या मिरवणूक निघते . तर गुरुवारी दि. २५ रात्री सर्व सवाऱ्याची गावात मिरवणूक काढण्यात येते .

**तीन दिवस चालणार उत्सव :** तीन दिवस चालणाऱ्या उत्सवासाठी अजिंठा शहरातील इनाम बाडा, हुसेनी महेल्ला, -त्रिपोला, खडक मोहल्ला जाम मस्जिद जवळ आणि शिवना गेट अशी ठिकठिकाणी मंडप टाकून सवाऱ्या बसवीण्यात आल्या .मोहरम पर्वातील सातव्या आणि आठव्या दिवशी म्हणजे मंगळवार दि. २३ आणि २४, २५ रोजी रात्री बडे नाल साहब, टापा सवारी, इमाम हसन हुसेन, नाले हैदर यांना भेटण्यासाठी बाहेर पडणार आहे . शुक्रवारी (दि . २६ )सकाळी मोहरम असून या दिवशी नाले हैदर ,पंजा ,, बुराख , या सवाऱ्या सकाळी पारंपारिक पद्धतीने विसर्जन होणार आहे . अजिंठा येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात उत्साहाने मोहरम सण साजरा होते .मोहरमच्या दहाव्या दिवशी मोहरम विसर्जनाच्या सवाऱ्या पाण्यासाठी मध्यप्रदेश, गुजरात सुरत , , जालना , आकोला खामगाव ,ब्राहाणपूर ,मालेगाव नागपूर येथून शेकडोच्या संख्येने भाविक शहरात येतात .अजिंठा मध्ये ५७ ते ६० सवारी दरवर्षी प्रमाणे यंदाही बसविण्यात आल्या .त्यात हिंदू बांधवांच्या मुस्लिम बांधवांच्या सवाऱ्या बसल्या जातात त्याची नोंदणी दर वर्षी रीतसर पोलीस दप्तर मध्ये नोंद करून घेतली जाते अनेक वर्षापासून हिंदू मुस्लिम एकतेने सवाऱ्या बसवण्याची परंपरा आहेत यंदा सवाऱ्या पाहाण्यासाठी मोठी गर्दी होणार असल्याचा अंदाज अनेकांनी व्यक्त केला आहे .

# परभणी येथे जागतिक योग दिन साजरा




हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** योगी केवळ व्यायाम पद्धती नसून निरोगी संतुलित आणि आनंदी जीवन जगण्याची जीवनशैली आहे या संदेशाचा प्रसार करत प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडियम परभणी येथे बारावा जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात आणि उत्स्फूर्त वातावरणात साजरा करण्यात आला.

जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांच्या उपस्थितीत अधिकारी कर्मचारी विद्यार्थी योगशिक्षक योग साधक नागरिक सामूहिक योगासने करून आरोग्यदायी जीवनाचा संकल्प केला जिल्हा प्रशासन पोलीस प्रशासन शिक्षण विभाग क्रीडा विभाग महानगरपालिका मेरा युवा भारत आणि जागतिक योग उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला यावर्षीच्या जागतिक योग दिनाच्या संकल्पना "निरोगी वृद्धत्वासाठी योग " आरोग्यदायी फायदे आणि जीवनातील महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी सात वाजता क्रीडा संकुल येथे झाली जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमापूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा जानकारी महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे यांच्या संविधान विभागाचे अधिकारी व मान्यवर उपस्थित होते

# बिडकीनमध्ये एकाच दिवशी निघाल्या चार जिवलग मित्रांच्या अंत्ययात्रा!

## आईचा हंबरडा, वडिलांचे कोसळलेले अश्रू; संपूर्ण बिडकीन बंद ठेवत गावकऱ्यांचा अखेरचा निरोप








**छत्रपती संभाजीनगर :** गणपतीपुळेच्या समुद्रातील एका क्षणाच्या दुर्घटनेने पाच कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त केले. आनंदाच्या सहलीसाठी गेलेली पाच तरुण लेकरं कायमची काळाच्या पडद्याआड गेली आणि सोमवारी (दि.२२ जून) त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी बिडकीनसह संपूर्ण परिसराने दुःखाचा महासागर अनुभवला. चार जिवलग मित्रांच्या एकाच दिवशी निघालेल्या अंत्ययात्रांनी बिडकीन गाव अक्षरशः सुन्न झाले. गावातील प्रत्येक रस्ता, प्रत्येक चौक आणि प्रत्येक घरातून अश्रूंचे हुंदके ऐकू येत होते. आपल्या लेकरांचे पार्थिव पाहताच मातांनी फोडलेला हंबरडा आणि वडिलांच्या डोळ्यातील अश्रू पाहून उपस्थितांचेही काळीज पिळवटून निघाले.

### बिडकीनने पाळला स्वयंस्फूर्त बंद

**दुर्घटनेनंतर गावावर पसरलेल्या शोककळेमुळे सोमवारी बिडकीनमधील व्यापारी प्रतिष्ठाने व सर्व आस्थापना बंद ठेवण्यात आल्या. गावातील नागरिक मोठ्या संख्येने अंत्ययात्रांमध्ये सहभागी झाले होते. चार तरुणांच्या अंत्ययात्रा एकाचवेळी निघाल्याने संपूर्ण गाव दुःखाच्या सावटाखाली होते.**

**शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार :** बिडकीन येथील आनंद राजू नरवडे (२०), प्रेम दीपक आदमाने (१९) आणि यश रामेश्वर कांबळे (१९) या तिघांवर सकाळी नऊ वाजता शेकटा फाटा येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. हजारो ग्रामस्थ, मित्रपरिवार आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत या तिन्ही तरुणांना अखेरचा निरोप देण्यात आला. दरम्यान, दुर्घटनेनंतर बेपत्ता असलेला आदित्य संतोष राऊत (२२) याचा मृतदेह रविवारी उशिरा सापडल्यानंतर सोमवारी सकाळी ११ वाजता त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आदित्यच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करताना कुटुंबीयांचा आक्रोश पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. तर अनिकेत बंडू हिवराळे (२०) याच्यावर त्याच्या मूळ गावी सोमपुरी (ता. पैठण) येथे सकाळी नऊ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. संपूर्ण गावाने अश्रुपूर्ण वातावरणात अनिकेतला अखेरचा निरोप दिला.

**"सहल म्हणून गेले... पण परतले तिरंग्यात नाही, तर शवपेटीत" :** काही दिवसांपूर्वी मित्रांसोबत आनंदाचे क्षण जगण्यासाठी निघालेली ही तरुण मंडळी आता कायमची निघून गेली. हातात स्वप्ने, डोळ्यांत भविष्य आणि कुटुंबाच्या अपेक्षा घेऊन जगणारी ही पाच उमलती फुले समुद्राच्या लाटांनी हिरावून घेतली. त्यांच्या जाण्याने केवळ कुटुंबेच नव्हे तर संपूर्ण बिडकीन हादरले आहे.

**मान्यवरांची उपस्थिती :** अंत्यसंस्कारावेळी माजी खासदार चंद्रकांत खैरे, जिल्हा परिषद सदस्य शिवराज भुमरे, जिल्हा परिषद सदस्य मनोज पेरे, सरपंच अशोक धर्मे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, युवक, नातेवाईक आणि हजारो ग्रामस्थ उपस्थित होते.

# फर्दापूर अजिंठा घाटात एका ट्रकचे ब्रेक निकामी




फर्दापूर . छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा घाटात एका ट्रकचे ब्रेक निकामी झाले असल्याने तो ट्रक डोंगराच्या नालीत उतरला सोमवारी सकाळी दहा वाजता आंध्रप्रदेश हुन इंदूर जाणारा ट्रक एच आर 73 ऐ 5851 या ट्रकचे घाट उतरत असताना ब्रेक निकामी झाले असल्याने ट्रक चालक यांनी प्रसंगावधान राखून कुठल्याही वाहनधारकांना धक्का न लागता डोंगराच्या नालीत ट्रक उतारूण उभा केला यातील चालक किल्नर यांना थोड्या प्रमाणात दुखापत झाली यावेळी घटनास्थळी फर्दापूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी फिरोज तडवी मदतनीस आकाश बोराडे आले आणि चालकाला विचारपूस करून अजिंठा येथून मेकानिक बोलून तीन तासात ट्रकचे काम करुन गाडी घाटाच्या खाली काढण्यात आली विशेष हा ट्रक रस्त्याच्या कडेला असल्याने घाटात ट्राफीक जाम झाला नाही त्यामुळे वाहतूक सुरळीत चालू होती

# चोरीच्या तयारीत असलेल्या तिघांना रेल्वे स्टेशनवरुन अटक

**छत्रपती संभाजी नगर प्रतिनिधी :** रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' मोहिमेअंतर्गत रेल्वे सुरक्षा बलाच्या गुन्हे गुप्तवार्ता शाखा आणि लोहमार्ग रेल्वे पोलिस यांच्या संयुक्त पथकाने एका मोठ्या चोरीचा डाव उधळून लावला आहे. छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या साहित्यावर पाळत ठेवून चोरीच्या तयारीत असलेल्या तीन संशयित आरोपींना पोलिसांनी रंगेहात अटक केली आहे. ही कारवाई १७ जून रोजी दुपारी सव्वादोनच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर करण्यात आली. यावेळी गाडी क्रमांक १२७८८ नागरसोल-नांदेड एक्स्प्रेस स्थानकात थांबली असताना, तीन संशयित व्यक्तींच्या हालचाली पोलिसांना संशयास्पद वाटल्या. हे तिघेही प्रवाशांच्या साहित्याची चोरी करण्याच्या उद्देशाने संधी शोधत असल्याचे पथकाच्या लक्षात आल्याने, त्यांनी तत्परता दाखवत त्यांना ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान, संशयित आरोपींची नावे मकसूद सलीम, जुम्मन साहा आणि मक्सुद साहा अशी असल्याचे समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, हे तिघेही जळगाव जिल्ह्यातील रहिवासी आहेत. रेल्वे स्थानकावर उपस्थित राहण्याबाबत त्यांना कोणतेही समाधानकारक कारण पोलिसांना सांगता आले नाही.

# रस्त्यांवरील अडथळे दूर करा, नालेसफाईची कामे तातडीने पूर्ण करा

## स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांचे अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश; पोल शिफ्टिंग व अतिक्रमण हटविण्यावर भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी रस्त्यांवरील वाहतुकीस अडथळा ठरणारे विद्युत पोल तातडीने स्थलांतरित करावेत तसेच सर्व नाल्यांची साफसफाई निर्धारित वेळेत पूर्ण करावी, असे निर्देश छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

महानगरपालिकेच्या विद्युत विभागाचा आढावा घेताना मकरिये यांनी शहरातील प्रलंबित पोल शिफ्टिंगच्या कामांचा आढावा घेतला. विशेषतः पैठण गेट ते गुलमंडी, सतीश मोटर्स ते महात्मा फुले चौक आणि महात्मा फुले चौक ते शाहू महाराज चौक या प्रमुख वर्दळीच्या मार्गांवरील पोल शिफ्टिंगची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या मार्गांवरील अडथळे दूर झाल्यास वाहतुकीची कोंडी कमी होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

यानंतर झोन क्रमांक १ ते १० मधील झोन अभियंत्यांची बैठक घेऊन शहरातील नालेसफाईच्या कामांचा आढावा घेण्यात आला. पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची संपूर्ण साफसफाई पूर्ण करण्याचे आदेश देताना नाल्यांमधून काढलेला गाळ रस्त्यांवर साचून राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

तसेच नाल्यांवरील अतिक्रमणे तातडीने हटवून पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, असेही मकरिये यांनी स्पष्ट केले. पावसाळ्यात पाणी तुंबण्याच्या समस्या टाळण्यासाठी प्रशासनाने वेळेत कामे पूर्ण करण्याची गरज असल्याचे त्यांनी बैठकीत अधोरेखित केले.

महानगरपालिकेच्या विविध विभागांनी समन्वयाने काम करून शहरातील पायाभूत सुविधांशी संबंधित प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावावीत, असे आवाहनही स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी केले.

# शेत जमिनीच्या वादातून सख्या भावानेच भावाचा केला हत्येचा प्रयत्न

हिंदूप्रकाश वार्ता प्रतिनिधी

परभणी - दोन सख्ख्या भावांमध्ये जमिनीचा वाद सुरू झाला त एका भावाने गतीने वार करून भावावर जीव घे ना हल्ला करण्यात आला ही घटना 19 जून रोजी दुपारी रोजी दुपारी बाराच्या सुमारास गंगाखेड तालुक्यातील सिरसम परिसरात घडली

सदरील प्रकरणी 21 जूनला गंगाखेड पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे अधिक माहिती अशी की उद्धव मुरकुटे यांनी तक्रार दिली आहे फिर्यादी व आरोपी हे सख्खे भाऊ असून त्यांच्यामध्ये बऱ्याच दिवसापासून शेताच्या वाटणीसाठी एका भावाचे शेतात जास्त जमीन म्हणजे 30 गुंठे जमीन चा वाद सुरू झाला फिर्यादी हे शेतात ट्रॅक्टरने पाणी घालत असताना आरोपींनी संगणमत करून धारदार पत्ती कराड आणि काटे घेऊन फिर्यादीला तू येथे पाळी का घालतो आहेस असे म्हणत शिव्याळ केली व ट्रॅक्टर खाली खेचून जीव मारण्याचे उद्देशाने हाता फिर्यादीच्या मानेवर वार केले हा वार फिर्यादीने हुकला मात्र कान चाळीवर जबर दुखापत झाली कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करण्यात आली आणि भांडण सोडण्यासाठी आलेल्या फिर्यादीच्या पत्नीलाही डोळ्यात चटणी टाकून मारहाण करण्यात आली याप्रकरणी माधव मुरकुटे सिंधू मुरकुटे साक्षी मुरकुटे यांच्यावर गुन्हा नोंद झाला असून पुढीलतपास पोलीस उपनिरीक्षक लोखंडे हे करत आहेत.

# अण्णा भाऊ साठे फाउंडेशनतर्फे आझाद मैदानावर बेमुदत उपोषण

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** मातंग समाजाच्या विविध जिव्हाळ्याच्या मागण्यांसाठी अण्णा भाऊ साठे फाउंडेशनच्या वतीने मुंबईत आझाद मैदानावर बेमुदत उपोषण करण्यात येत आहे. अनुसूचित जातीचे अ, ब, क, ड वर्गीकरण तत्काळ करण्यात यावे, श्रीक्षेत्र मंदिर, छत्रपती संभाजीनगर येथील इनामी जागेची सीआयडीमार्फत चौकशी करून ती तत्काळ यात्रेसाठी विविध धार्मिक कार्यक्रम व मुलांना खेळण्यासाठी मैदान खुले करून देण्यात यावे, संभाजीनगर येथील शेंद्रा औद्योगिक पंचतारांकित वसाहतीला श्रीक्षेत्र मांगिरबाबा औद्योगिक पंचतारांकित वसाहत असे नाव देण्यात यावे, साहत्यिरत्न अण्णा भाऊ साठे विकास महामंडळातर्फे शासनाने घोषित केलेल्या ५० लाख रुपयाचे कर्जाचे वाटप तत्काळ करण्यात यावे, क्रांतिवीर लहुजी साळवे अभ्यास आयोगाच्या शिफारशी तत्काळ लागू करण्यात याव्यात, छत्रपती मनपाने मंजूर केलेल्या जागेवर साहत्यिरत्न अण्णा भाऊ साठे सांस्कृतिक सभागृह तात्काळ बांधण्यात यावे, छत्रपती संभाजीनगर येथे मनपाने मंजूर केलेल्या जागेवर क्रांतिवीर लहुजी साळवे यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात यावा, पैठण तालुका व बीड जिल्ह्यात मातंग समाजातील तरुणाची निघृर्णपणे हत्या करण्यात आली आहे, त्याची चौकशी सीआयडी मार्फत करण्यात यावी व आरोपींना तात्काळ अटक करून हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवून दोषींना फाशी देण्यात यावी आदी विविध मागण्यांसाठी ९ जूनपासून

उपोषण सुरू आहे. उपोषणाचे नेतृत्व अण्णा भाऊ साठे फाउंडेशनचे अध्यक्ष राजू भालेराव हे करीत असून, यामध्ये विनायक वाघुले, सुभाष पाचुंदे, जॉन आव्हाड, राजू अहिरे, डॉ. रवींद्र शिरसाठ, निलेश मावस, जीवन भालेराव, दत्तोपंत तुपे आदी शेकडो कार्यकर्ते उपोषणामध्ये सहभागी झाले आहेत.

# शिंदे सेनेचे सईद खान. विजयाने कार्यकर्त्यात जल्लोष

## डॉक्टर विवेक नावंदर दुसऱ्या क्रमांकावर तर सुशील देशमुख तिसऱ्या क्रमांकावर




**परभणी :** परभणी हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघात झालेल्या निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला आहे 18 जून रोजी पार पडलेल्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार शिवसेनेचे शिंदे गटाचे सईद खान विजयी झाले आहेत 242 मते मिळाली उभटाचे उमेदवार डॉक्टर विवेक नावंदर यांचा पराभव डॉक्टर नावंदर यांना 159 तर अपक्ष सुशील देशमुख यांना 56 मते मिळाली तर आठ मते बाद झाली

या निवडणुकीसाठी एकूण 466 मतदारांपैकी 405 मतदार आणि मतदान केले त्यापैकी 220 शिवसेनेचे महायुतीचे उमेदवार सईद खान विजयी झाले आहेत तर महाविकास आघाडी डॉक्टर विवेक नावंदर यांना 1569मते मिळाली असूनतर अपक्ष सुशील देशमुख यांना 56 मते मिळाली असून पहिल्यांदाच विधान परिषदेच्या निवडणुकीत आठ मते बाद ठरली आहेत या मतदारसंघात राष्ट्रवादी अजित पवार गटात कडे जास्त जागा असून लागली मात्र ही जागा शिवसेनेचे असल्याने शिवसेनेकडेच राहील असे स्पष्ट करण्यात आले होते त्यानंतर सेने कडून माजी आमदार विप्लो बिजोरिया अभिमन्यू खोतकर यांनी उमेदवारी मागितली होती परंतु या दोघांपैकी एकालाही उमेदवारी मिळावी असे गणित लावले जात असताना ऐनवेळी शिवसेनेचे अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष सहित खान यांना उमेदवारी देण्यात आली

या निवडणुकीत एकूण 465 मतदान झाले सोमवार दिनांक 22 जून रोजी मतमोजणी झाली त्यामध्ये सईद खान यांना 242 डॉक्टर विवेक नावंदर यांना 159 तर अपक्ष सुशील देशमुख यांना 56 मते मिळाली मोजणीत एकूण आठ मते बाद ठरली मतमोजणी झाल्यानंतर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा अधिकारी संजय चव्हाण यांनी विजयाचे प्रमाणपत्र सईद खान यांना दिले यावेळी यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार शिवसे जिल्हाप्रमुख आनंद भरोसे विशाल कदम आसिफ खान आधीची उपस्थिती होती सईद खान निवडून आल्याने जाहीर होताच कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष करून गुलाल उधळला कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे हर्ष उल्हासाचे वातावरण निर्माण झाले.

# घाटीच्या शल्यचिकित्साशास्त्र विभागाचे अत्याधुनिक मॉड्युलर शस्त्रक्रियागृह कार्यान्वित



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे रुग्णांना अत्याधुनिक आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. शल्यचिकित्साशास्त्र विभागाचे अत्याधुनिक मॉड्युलर शस्त्रक्रियागृह (मॉड्युलर ऑपरेशन थिएटर) कार्यान्वित करण्यात आले असून, यामुळे रुग्णांना अधिक सुरक्षित, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शस्त्रक्रिया सेवा मिळणार असल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी दिली.

शल्यचिकित्साशास्त्र विभागांतर्गत उभारण्यात आलेल्या या मॉड्युलर शस्त्रक्रियागृहाचे उद्घाटन १ मे रोजी पालकमंत्री तथा सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते, महापौर समीर राजुरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले होते. त्यानंतर आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून २२ जून रोजी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या उपस्थितीत हे शस्त्रक्रियागृह प्रत्यक्ष सेवेसाठी सुरू करण्यात आले.

या अत्याधुनिक शस्त्रक्रियागृहात शल्यचिकित्सा विभागाच्या युनिट क्रमांक ३ मार्फत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विविध शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. यामध्ये लॅप्रोस्कोपिक कोलेसिस्टेक्टॉमी (दुर्बिणीद्वारे पित्ताशय काढण्याची शस्त्रक्रिया), स्तनातील फायब्रोॲडेनोमा गाठीचे शस्त्रक्रियेद्वारे निष्कासन, पाठीवरील लिपोमा काढण्याची शस्त्रक्रिया आदी उपचारांचा समावेश आहे.

या प्रसंगी शल्यचिकित्साशास्त्र विभागप्रमुख डॉ. सरोजिनी जाधव, बधिरिकरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. गायत्री तडवळकर, उपअधिष्ठाता डॉ. सुरेश हरबडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचिता जोशी यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शस्त्रक्रियांच्या यशस्वी आयोजनासाठी शल्यचिकित्सा व बधिरिकरणशास्त्र विभागातील डॉ. अनिता कंदी, डॉ. गणेश निकम, डॉ. अनिसा, डॉ. नोमान खान, डॉ. पंकज वैरागड, डॉ. जगन्नाथ आणि डॉ. शोएब यांनी विशेष योगदान दिले. तसेच ऑपरेशन थिएटरच्या यशस्वी कार्यान्वयनासाठी मेट्रन संजीवनी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ओटी इन्चार्ज चंदा ठाकरे, रवी रावत, जयश्री ठाकूर, विशाल वाघे, वर्षा घोलक तसेच वर्ग-४ कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# मागणीवेळी पंच साक्षीदार अनुपस्थित, PSI राजू सांगळे यांना अटकपूर्व जामीन

**छत्रपती संभाजीनगर :** भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील गुन्ह्यातील आरोपी पोलीस उपनिरीक्षक (PSI) राजू विष्णू सांगळे यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने अटकपूर्व जामीन मंजूर केला. न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांनी दिलेल्या आदेशात, कथित लाच मागणीच्या वेळी पंच साक्षीदार प्रत्यक्ष उपस्थित होता की नाही याबाबत प्रथमदर्शनी शंका निर्माण होत असल्याचे नमूद केले.

सरकार पक्षाने पंच साक्षीदार आरोपीच्या कक्षात उपस्थित असल्याचा दावा केला होता. मात्र PSI सांगळे यांच्यावतीने अ‍ॅड. प्रशांत एम. नागरगोजे यांनी माहिती अधिकारातून प्राप्त सीसीटीव्ही फुटेज न्यायालयासमोर सादर करून पंच साक्षीदार हा आरोपीच्या कक्षात अत्यंत अल्प काळासाठीच उपस्थित असल्याचे निदर्शनास आणून दिले. अ‍ॅड. नागरगोजे यांना अ‍ॅड. सौरभ मंगरुळे यांनी सहकार्य केले. न्यायालयाने मागणी पडताळणी पंचनाम्याचे परीक्षण करताना पंच साक्षीदार कथित मागणीच्या वेळी उपस्थित नसल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे नमूद केले. त्यामुळे पुढील सुनावणीपर्यंत अर्जदाराच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने PSI सांगळे यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला.

# महायुतीचा गुलाल! छत्रपती संभाजीनगर-जालना विधानपरिषद निवडणुकीत सुहास शिरसाट प्रचंड मतांनी विजयी

## महाविकास आघाडीचे गणेश लोखंडे चारीमुंड्या चीत; शिरसाट यांना 455 मते, कार्यकर्त्यांचा जल्लोष!

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकीय वर्तुळाचे संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेणाऱ्या छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक प्राधिकारी विधानपरिषद मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीने आपला गड राखत दणदणीत विजय मिळवला आहे. महायुतीचे अधिकृत उमेदवार सुहास शिरसाट यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा धुव्वा उडवत ४५५ मतांसह भव्य विजय संपादन केला आहे. निकाल जाहीर होताच कार्यकर्त्यांनी छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यात प्रचंड जल्लोष करत 'जय भवानी, जय शिवाजी' आणि 'महायुतीचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.



### गुलालाची उधळण आणि फटाक्यांची आतषबाजी!

**सुहास शिरसाट यांच्या विजयाची बातमी समजताच मतमोजणी केंद्राबाहेर आणि संपूर्ण शहरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकच गर्दी केली होती. अंगावर गुलालाची उधळण करत, ढोल-ताशांच्या गजर आणि फटाक्यांच्या प्रचंड आतषबाजीत हा विजय साजरा करण्यात आला. या विजयाने आगामी राजकीय गणितांमध्ये महायुतीचे पारडे कमालीचे जड असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.**

या निवडणुकीत सुरुवातीपासूनच चुरस पाहायला मिळत असली, तरी प्रत्यक्षात मतमोजणीत सुहास शिरसाट यांनी एकतर्फी आघाडी घेतल्याचे स्पष्ट झाले. निवडणुकीच्या रिंगणात एकूण तीन उमेदवार नशीब आजमावत होते. मात्र, महायुतीच्या अभेद्य तटबंदीसमोर विरोधक पूर्णपणे भुईसपाट झाले. महाविकास आघाडीचे उमेदवार गणेश लोखंडे यांना अवघी १३५ मते मिळवता आली, तर अपक्ष उमेदवार इसाक खान सांडू खान यांना केवळ ३५ मतांवर समाधान मानावे लागले. या निवडणुकीत ५ मते अवैध ठरली. मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी सुहास शिरसाट यांच्या विजयाची अधिकृत घोषणा केली आणि त्यांना विजयाचे प्रमाणपत्र सुपूर्द केले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911